**वाचले:**

१. पत्र क्र.साप्रवि/४/कावि/१०५८/२०२३, दिनांक १५/१२/२०२३.
२. पत्र क्र. साप्रवि/४/कावि/७५२/२०२४, दिनांक १२/०३/२०२४.
३. श्री. किरण अशोक पोळ यांचा दि. २२/०३/२०२४ रोजीचा ई-मेल.
४. मा.आयुक्त यांचा दि. ०८/०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८ सामान्य प्रशासन विभाग
क्र.सा.प्र.वि/४/कावि/९४३/२०२४
दिनांक - १० /०६ /२०२४

**विषय -लिपिक पदावरील निवड रद्द करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील लिपिक अभिनामाची पदे नामनिर्देशनाव्दारे भरणेकामी दिनांक २०/०२/२०२४ रोजी अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून,खालील गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड कर्मचारी निवड समितीने केलेली आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | गोपाल शामराव आगरकर | खुला सर्वसाधारण |
| २ | चेतन प्रल्हाद मगदूम | ईडब्ल्युएस सर्वसाधारण |
| ३ | रुचिता कृष्णराव करोले | खुला (महिला) |
| ४ | पूजा लक्ष्मण इथापे | खुला (महिला) |
| ५ | गजानन अंजनराव लगड | खुला (प्रकल्पग्रस्त) |
| ६ | परमेश्वर मल्लिकार्जुन लुटे | ईडब्ल्युएस (माजी सैनिक) |
| ७ | अनिल फुलचंद चाटे | खुला (माजी सैनिक) |
| ८ | प्रदीप ज्ञानेश्वर जिंदम | विमाप्र सर्वसाधारण |
| ९ | किरण अशोक पोळ | ईडब्ल्युएस (माजी सैनिक) |

उपरोक्त अ.क्र.१ ते ८ उमेदवारांना वाचले क्र.१ अन्वये पुर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी करुन घेणेकामी आवश्यक असलेला साक्षांकन नमूना फॉर्म भरुन घेणेकामी सामान्य प्रशासन विभागात उपस्थित रहाणेकामी कळविले होते. तथापि उपरोक्त नमूद अ.क्र.१ ते ८ वरील उमेदवार उपस्थित राहिले नाही. त्यानंतर वाचले क्र.२ चे पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागात उपस्थित रहाणेकामी स्मरणपत्राद्वारे अंतिम मुदतवाढ/संधी देण्यात आली होती. तथापि, उपरोक्त उमेदवार सामान्य प्रशासन विभागात उपस्थित राहिलेले नाही अथवा लिपिक पदावर रुजू होणेकामी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार/ ई-मेल सामान्य प्रशासन विभागाशी केला नाही. त्यामुळे उपरोक्त उमेदवारांना लिपिक पदावरील नोकरीची आवश्यकता नाही. असे दिसून येते. तसेच अ.क्र.९ वरील उमेदवाराने वाचले क्र.३ चे लेखी/ई-मेलद्वारे लिपिक पदावर रुजू होण्यास इच्छुक नसल्याबाबत कळविले आहे. त्यामुळे उपरोक्त नमूद अ.क्र.१ ते ९ वरील उमेदवारांची लिपिक या पदावरील नियुक्ती रद्द करणे आवश्यक आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये उपरोक्त तक्त्यातील नमूद अ.क्र. १ ते ९ वरील उमेदवारांची लिपिक पदाकरीता निवड यादीवरील करण्यात आलेली निवड रद्द करण्यास मान्यता देत आहे.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

**प्रत-**

संबंधित उमेदवार.